# कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे
## श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे-३७

जा.क्र.-नियमन/मालमत्ता/ वारसनोंद/जा.सू./गाळा क्र.४९८/2७23/२०२५-२६ दि.११/२/२०२६

### <u>जाहीर सूचना</u>

श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड गुलटेकडी पुणे येथील फळे भाजीपाला विभागातील गाळा क्रमांक ४९८ हा गोविंद निवृत्ती केदारी यांना नियमित शेतीमालाच्या ठोक व्यवसायासाठी भाडेपट्ट्याने देण्यात आला आहे. सदर गाळ्याचा नोंदणीकृत भाडेपट्टा मे. दिनानाथ ट्रेडींग कंपनी रजि.भागीदारी पेढीतर्फे भागीदार १) श्री. गोविंद निवृत्ती केदारी २) श्री. नारायण निवृत्ती केदारी या नावे झाला आहे. परंतु गोविंद निवृत्ती केदारी यांचे दिनांक १८/१०/२०१४ रोजी व त्यांच्या पत्नी आनंदीबाई गोविंद केदारी यांचे दिनांक २९/१/२०१३ रोजी निधन झालेमुळे त्यांचा मृत्युदाखला व कै. गोविंद निवृत्ती केदारी यांनी त्यांचे हयातीत लिहून व नोंदवून ठेवलेल्या नोंदणीकृत मृत्युपत्रानुसार सदर गाळ्यावरील त्यांचा हिस्सा श्री. हिरामण गोविंद केदारी यांचे लाभात दिला होता. परंतु गोविंद निवृत्ती केदारी यांचे नोंदणीकृत मृत्युपत्रानुसार हिरामण गोविंद केदारी यांची सदर गाळ्यावर नोंद होणेपुर्वी दिनांक १०/११/२०२३ रोजी निधन झाले असून त्यांच्या पत्नी मंगला हिरामण केदारी यांचेही दिनांक २२/१०/२०२५ रोजी निधन झाले आहे. त्यामुळे हिरामण गोविंद केदारी यांचे वारसांनी वारसांबाबत जबाबदारी निभावणेकामी सादर केलेले प्रतिज्ञापत्र तसेच श्रीमती राधिका भगवान शेवकर यांनी मृत्युपत्राबाबत दाखल केलेला दावा मा. न्यायालयाने फेटाळलेने आणि भागीदार श्री. नारायण निवृत्ती केदारी यांचे संमतीपत्रानुसार सदर गाळ्यावर मे. दिनानाथ आणि कंपनी तर्फे भागीदार १) श्री. नारायण निवृत्ती केदारी यांचे हिश्यातील नाव व मालकी हक्क कायम ठेवून भागीदार कै. गोविंद निवृत्ती केदारी यांचे निधनामुळे त्यांचे हिश्श्यात १) श्री. रत्नाकर हिरामण केदारी (मुलगा) २) सौ. भावना अशोक धायरकर (लग्नापुर्वीचे नाव – कु. राणी हिरामण केदारी - मुलगी) ३) सौ. पौर्णिमा दिपक कुदळे (लग्नापुर्वीचे नाव – कु. पौर्णिमा हिरामण केदारी) ४) कै. रत्ना अमर शिंदे (लग्नापुर्वीचे नाव – कु. रत्ना हिरामण केदारी) यांचे निधनामुळे त्यांचे हिश्श्यातील वारसदार म्हणून त्यांची मुलगी कु. काव्या अमर शिंदे यांची वारसनोंद होणेकामी संबंधितांनी या कार्यालयाकडे अर्ज सादर केलेला आहे.

तरी, सदर वारसनोंदीबाबत कोणाची काही तक्रार/हरकत असल्यास, दिनांक 28/2/2026 पावेतो कृषि उत्पन्न बाजार समिती पुणे यांचे कार्यालयामध्ये लेखी स्वरुपात कळवावे. त्यानंतर कोणतीही तक्रार/हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सचिव सभापती
कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

<u>प्रत</u> -
विभाग प्रमुख
फळेभाजीपाला विभाग.